Tip 15-6-2017

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-१/ ६१९
सामान्य प्रशासन विभाग
सोलापूर, दि.३० /१२/२०१७

# -जाहिरात -

## Walk In Interview

दि.१०/०१ /२०१८ सकाळी १०:३० वाजता.

स्थळ:- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, रेल्वे लाईन, सोलापूर

सोलापूर महानगरपालिकेमध्ये संगणक विभागांतर्गत Senior System analyst(वरिष्ठ सिस्टिम विश्लेषक ), System Administrator(सिस्टिम प्रशासक) व Database Administrator ही पदे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरणेकामी खालील शैक्षणिक पात्रता प्राप्त व अनुभव असणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल.

| अ.क्रं | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | Senior System analyst(वरिष्ठ सिस्टिम विश्लेषक ) | १(एक) | B.E/B.Tech in Computer Science/ Information Technology from a recognized university<br>**Experience. :**<br>१) One Year experience in System analyst and programming required with project management or leadership responsibilities<br>२) Having knowledge of Javascript,jQuery,ASP,NET Framework,Java/J२EE, and Microsoft SQL Server and Oracle. | एकवट मानधन रुपये २५,०००/- |
| २. | System and Network administrator (सिस्टिम प्रशासक) | १(एक) | B.E/B.Tech in Electronics/Computer Science/ Information Technology from a recognized university and networking course of CCNA from a recognized university<br>**Experience. :**<br>One Year experience in System and Network Administration in any organization Having knowledge of CCTV installation and maintenance. | एकवट मानधन रुपये २५,०००/- |
| ३. | Database Administrator | १(एक) | BE/BTech in Computer Science/ Information Technology from a recognized university OR MCA from a recognized university<br>**Experience. :**<br>One Year experience in Database Administratation in project management, Having knowledge of Javascript,jQuery,ASP,NET Framework,Java/J२EE, and Microsoft SQL Server and Oracle. | एकवट मानधन रुपये २०,०००/- |

सदरची नियुक्ती सहा महिन्याच्या कालावधीकरीता असणार आहे, आवश्यकता भासल्यास मुदतवाढ देण्यात येईल. सदरच्या जाहिरातीबाबत अधिक माहिती व शर्ती/अटी सोलापूर महानगरपालिकेच्या WWW.solapurcorporation.gov.in व www.solapurcorporation.org या संकेतस्थळावरही प्रसिध्द करणेत आलेली आहे.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका सोलापूर

## सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेमध्ये संगणक विभागांतर्गत Senior System analyst(वरिष्ठ सिस्टिम विश्लेषक ), System Administrator(सिस्टिम प्रशासक) व Database Administrator ही पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरणेकामी खालीलप्रमाणे शर्ती व अटी राहतील.

१) सदरची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात करारतत्वावर राहील. सदरचे करारपत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे लागेल.

२) सदर पदावरील नियुक्तीही तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधीकरिता असून पुर्णवेळ काम करणेच्या अटीवर राहील.

३) Senior System analyst(वरिष्ठ सिस्टिम विश्लेषक ) या पदासठी दरमहा मानधन रुपये २०,०००/-, System Administrator(सिस्टिम प्रशासक) साठी रुपये २०,०००/- व Database Administrator साठी रुपये १५,०००/- एवढे करारपध्दतीने दरमहा एकवट मानधन दिले जाईल.

४) आपली नियुक्तीही सोलापूर महानगरपालिकेच्या संपुर्ण संगणक विभागाकडील त्याअनुषंगिक कामे व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणेचे आहे. तसेच याशिवाय वरिष्ठ अधिकाऱ्याकडून वेळोवेळी सांगतील ती कामे व कर्तव्ये पार पाडावी लागतील.

५) सदरचे पदावर करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्ती असल्याने, भविष्यात म.न.पा.कडे सदर पदावर हक्क सांगता येणार नाही व नोकरीत कायम करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६) नियमित शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे अन्य कोणतेही लाभ, वेतनश्रेणी, रजा, पेन्शन इ. अनुज्ञेय असणार नाही.आपली नियुक्ती ही करार तत्वावर व फक्त एकत्रित मानधनावर आहे.

७) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्तीपत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही.

८) आपण जर अन्य ठिकाणी नोकरीस असेल तर त्या संस्थेचा/कार्यालयाचा राजीनामा स्विकृत केल्याचा पुरावा मला हजर करणे बंधनकारक आहे.

९) सदरचे नियुक्तीपत्र मिळालेपासून सात दिवसांचे आत कामावर रुजू व्हावे लागणार आहे. सदरचे नियुक्तीपत्र मिळूनही आपण सबळ कारणामुळे हजर होऊ शकत नसाल व ती कारणे मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, यांचे समाधान करु शकत नसतील तर आपले नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल व त्यानंतर नेमणूकीबाबत आपल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१०) आपणास करारातून मुक्त व्हावयाचे असल्यास किमान ३० दिवसांची पुर्वसुचना नियुक्ती प्राधिकाऱ्यास देणे अथवा तीस दिवसांचे एकवट वेतन रक्कम नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे जमा करणे आवश्यक आहे.

११) आपण सादर केलेली कागदपत्रांच्या सत्यतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

आयुक्त

सोलापूर महानगरपालिका , सोलापूर